म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय का. वा.
दा. क्र. १०५६ २००६

२००६

# [illegible]-दल

IRBK-0102006
IRBK-0102006

सौ. जोशी आणि
श्री. जोशी

# दूत

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बालवाङ्मय
वा. नं. १०६

म. ग्रं.
विषय



वभारत प्रकाशन सं

बाल-वाङ्मय-माला : ३४

म. ग्रं. सं. ठाणे.
23 MAY 1975


# चन्द्र-दूत

आणि

# इतर गोष्टी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. 2006

लेखक

सौ. प्रभावती जोशी, बी. ए., एस्. टी. सी.

भालचन्द्र गोपाळ जोशी, एम्. ए., बी. टी.

IRBK-0102006

किंमत ८ आणे

नवभारत प्रकाशन-संस्था, मुंबई ४

# अनुक्रम


| | पान | | पान |
|---|---|---|---|
| १. माकड-टोपी ... | १ | ८. चटकदार रेवडी ... | १८ |
| २. गरम जांभळें ... | ५ | ९. तीन भांडखोर राक्षस | २१ |
| ३. लुडबुडीं पांखरें ... | ८ | १०. हलवायाला अहेर | २४ |
| ४. जखमी उंदीर ... | १० | ११. हजार रुपयांची थैली | २७ |
| ५. सिंह आणि शिकारी | १२ | १२. अंगठीचा लोभ ... | ३१ |
| ६. उंटाची मान ... | १४ | १३. एक घाव, दहा तुकडे ! | ३४ |
| ७. नारळाचें नशीब ... | १६ | १४. गुराख्याची शिळा | ३९ |

१५. चन्द्र-दूत ... ४५


* *


प्रथमावृत्ति–१९४४




सर्वाधिकार प्रकाशकाधीन


* *
*


: प्रकाशक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
नवभारत प्रकाशनसंस्था,
मुंबई ४

: मुद्रक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४

# १. माकड-टोपी



दिनू घराबाहेर पडला आणि एकादा कुत्रा त्याच्या अंगावर भुंकला नाहीं असें कधीं व्हावयाचें नाहीं. कुत्रा अंगावर भुंकला कीं दिनू त्याला दगड मारीत असे.

एके दिवशीं दिनूची गंमत झाली. फिरत फिरत तो गांवाबाहेर गेला. गांवाबाहेर रान होतें. रानांत खूप झाडें होतीं. त्या झाडांवर खूप माकडें होतीं.

एका माकडानें खालीं उडी टाकली आणि दिनूची टोपी पळविली. मग तें झाडावर जाऊन बसलें.

दिनू म्हणाला, " माकडा, माकडा, माझी टोपी दे. "

माकड म्हणालें, " पोरा, पोरा, मला खवा दे; मग तुझी टोपी मी देईन. "

तेव्हां दिनू गवळणीकडे गेला आणि म्हणाला, " गवळणी, गवळणी, मला खवा दे. मी तो माकडाला देईन. मग माकड माझी टोपी देईल. "

गवळण म्हणाली, " पोरा, पोरा, दूध तापवायला लाकडें दे; मग मी तुला खवा करून देईन. "

मग दिनू लाकूडतोड्याकडे गेला आणि म्हणाला, " लाकूडतोड्या, लाकूडतोड्या, मला लाकडें दे. मी तीं गवळणीला देईन. मग गवळण दूध तापवील आणि त्याचा खवा करून मला देईल. मी खवा माकडाला देईन. मग माकड माझी टोपी मला देईल. "

लाकूडतोड्या म्हणाला, " पोरा, पोरा, माझी कुऱ्हाड हरवली आहे. नवी कुऱ्हाड आणून दे. मग मी तुला लाकडें तोडून देईन. "

तेव्हां दिनू लोहाराकडे गेला आणि म्हणाला, " लोहारदादा, लोहारदादा, मला कुऱ्हाड दे. मी कुऱ्हाड लाकूडतोड्याला देईन. तो मला लाकडें तोडून देईल. तीं लाकडें मी

गवळणीला देईन. गवळण मला खवा करून देईल. तो खवा मी माकडाला देईन. मग माकड माझी टोपी मला देईल. ”

लोहार म्हणाला, “ देईन कुऱ्हाड, पण माझ्या कुत्र्याला कधीं दगड मारूं नको. आहे कां कबूल ? ”

दिनू म्हणाला, “ आहे कबूल, नाहीं दगड मारणार ! ”

मग लोहारानें दिनूला कुऱ्हाड दिली. ती दिनूनें लाकूडतोड्याला दिली. लाकूडतोड्यानें दिनूला लाकडें तोडून दिलीं. तीं लाकडें दिनूनें गवळणीला दिलीं. गवळणीनें दिनूला खवा करून दिला. तो खवा दिनूनें माकडाला दिला. मग माकडानें दिनूला टोपी परत दिली.

---

## २. ग ांभळें !

कुमाराला जांभळें फार आवडत. उन्हाळ्याच्या सुटींत दररोज दुपारच्या वेळीं तो हिंडायला निघे. रस्त्याच्या कडेला जांभळींचीं कांहीं झाडें होतीं. त्यांचीं जांभळें तोडून खाणें हा तर त्याचा नित्याचा क्रम !

असाच एके दिवशीं कुमार झाडावर चढून जांभळें खात होता. रस्त्याच्या कडेला तें झाड होतें. भर दुपारची वेळ ! त्या वेळीं त्या रस्त्यानें एक म्हातारी जात होती. आधींच ती थकलेली होती, त्यांतून उन्हाचा त्रास ! तिला विलक्षण घाम येत होता आणि त्यामुळें ती फार दमली होती.

जांभळीचें झाड रस्त्याच्या कडेला दिसतांच ती त्याखालीं थांबली. जरा विसावा घेऊन पुढें जावें असा तिनें विचार केला.



तिनें सहज वर पाहिलें, तों तिला कुमार दिसला. त्याला ती म्हणाली, “ काय रे मुला ! वर फांदीवर बसून काय करतोस आहेस ? ”

" मी ना ? मी विश्रांति घेतों आहे ! किती थंड हवा आहे या फांदीवर ! "

" आणि काय खातो आहेस रे ? मला म्हातारीला उगाच फसवूं नकोस. जांभळंच असतील बहुधा ! " म्हातारी पुढें म्हणाली.

" हो ! जांभळं खाणं हा तर माझा नित्यक्रम ! तुम्हांला हवींत कां थोडींशीं ? "

" हो ! टाक कीं कांहीं खालीं. "

" गरम जांभळं कां थंड जांभळं ? कोणतीं टाकूं ? "

" अरे, म्हाताऱ्या माणसाची अशी चेष्टा करूं नये. "

" खरंच, आजीबाई ! इथं दोन्ही प्रकारचीं जांभळं आहेत. कोणतीं टाकूं तुमच्यासाठीं ? मी कशाला चेष्टा करूं ? तुम्हांला हवीं असतील तीं देतों. "

म्हातारीला आला राग. ती म्हणाली, " टाक दोन्ही प्रकारचीं थोडीं थोडीं. "

कुमारानें जांभळाच्या झाडाची फांदी हलवली. त्याबरोबर जांभळें पटापट खालीं पडूं लागलीं. कांहीं पिकलेलीं जांभळें आणि कांहीं कच्चीं जांभळें भराभर खालीं मातींत पडलीं.

म्हातारी चटकन् उठली व पिकलेलीं जांभळें गोळा करावयाला लागली.

जीं जांभळें पिकलेलीं होतीं, तीं खालीं पडतांच त्यांना मातीचे कण चिकटले होते. म्हणून तीं खाण्यापूर्वी म्हातारी तीं जांभळें हातावर चोळूं लागली व फुंकून खाऊं लागली.

तें पहातांच कुमार म्हणाला, "बरोबर ! आजीबाई, तुम्हांला गरम जांभळंच हवीं होतीं !"

"कशावरून रे ?"

"वा, जांभळं गरम नसतीं तर फुंकून कशाला खाल्लीं असतीं तुम्हीं ?"

"वा ! वा ! बराच लबाड आहेस, हं !"

असें म्हणून त्याला शाबासकी देऊन ती म्हातारी आपली वाट चालूं लागली.

---

## ३. लुडबुडीं पाखरें

थंडीचे दिवस होते. सगळीकडे थंडीचा कडाका पडला होता. मग अरण्यांत तर किती थंडी वाजत असेल ! तिथें ना घरें ना उबदार पांघरुणें ! शेकोटीचें तर नांवच नको !

अशा थंडीच्या कडाक्यांत एकदां एका अरण्यांत दोन वानर राहत असत. ते दोघेहि थंडीनें कुडकुडूं लागले.

तों एका वानराला एक काजवा दिसला. वानर आपल्या सोबत्याला म्हणाला, "अरे, तो बघ, त्या तिथें विस्तव पेटलेला दिसतो आहे ! माणसें नाहीं का शेकत बसत ? तसे आपण शेकत बसूं, चल !"

"खरंच, काय कडक थंडी पडली आहे ! उहुऽहु ! उहुऽहु !....चल जाऊं या !" दुसरा वानर म्हणाला.

काजवे चमकत होते, त्या ठिकाणीं ते दोन्ही वानर गेले. त्यांनीं थोडींशीं वाळलेलीं पानें आणि काटक्या गोळा केल्या, आणि तीं पानें आणि काटक्या त्यांनीं काजव्यांवर टाकलीं.

लाकूडतोडे असेच शेकत बसलेले त्यांनीं अनेकदां पाहिले होते. त्या काजव्यांवर हात धरून दोघेहि शेकूं लागले.

मग पहिला वानर त्या काजव्यांवर फुंकर घालूं लागला ! हो, तीं वाळलेलीं पानें पेटायला नकोत कां ?

त्या वानरांचा मूर्खपणा दोन पांखरें झाडावर बसून पहात होतीं. त्यांना वानरांचें हसूं येऊं लागलें ! तीं वानरांजवळ जाऊन त्यांना म्हणालीं, " तुम्ही त्या काजव्यांवर काय शेकतां ? तो कांहीं विस्तव नव्हे ! त्यापासून तुम्हांला ऊब कशी मिळणार ? "


" अरे जा, मोठीं आलीं आहेत शहाणपण शिकवायला ! " वानर त्यांच्यावर ओरडले, " उगीच मधें मधें लुडबूड नका करूं ! "

" छे ! छे ! आम्ही खरं तेंच सांगत आहों. तुम्ही निष्कारण आपला वेळ घालवीत आहांत ! " पांखरें वानरांना म्हणालीं.

" चला, चालतीं व्हा येथून ! रिकामटेकडी लुडबुड कुणी सांगितली आहे करायला ! लागलीं उगीच उपदेश करायला ! " वानर त्या पक्ष्यांना म्हणाले.

पण तीं पाखरें कुठलीं त्या वानरांकडे लक्ष द्यायला ! पुनः पुनः तीं वानरांना तेंच तेंच सांगूं लागलीं ! वानरांना कुठें पर्वा होती असल्या उपदेशाची !

सरतेशेवटीं त्यांपैकीं एका वानराला इतका राग आला कीं त्यानें त्या पक्ष्यांवर एकदम झडप घातली आणि त्यांना मारून टाकलें !



## ४. जखमी उंदीर

एक होता उंदीर. तो एकदां वहीवहींतून धावत होता. त्याच्या पायांत बाभळीचा कांटा मोडला आणि त्यांतून रक्त वाहूं लागलें.

गरीब बिचारा उंदीर ! त्याचा पाय ठणकूं लागला.

तो लंगडत लंगडत गेला एका म्हातारीकडे, आणि म्हणाला, “ आजी, आजी, माझ्या पायांत कांटा रुतला आहे. हें पहा कसं रक्त वाहत आहे ! मला एक फडकं दे पाय बांधायला ! ”

म्हातारी म्हणाली, “ मला थोडा कापूस आणून दे. मी वाती करणार आहें देवाच्या आरतीसाठीं ! मग देतें मी तुला एक फडकं. ”

मग उंदीर गेला चिमणीकडे, आणि म्हणाला, “ चिऊताई, चिऊताई, मला थोडासा कापूस दे ना ! मी तो देईन म्हातारीला वाती करायला. मग मला आजी एक फडकं देईल माझा पाय बांधायला. ”

चिमणी म्हणाली, “ उंदीरदादा, उंदीरदादा, मला थोडे तांदुळाचे दाणे दे खायला. मग देतें मी तुला कापूस. ”

मग उंदीर एका शेतकऱ्याकडे गेला आणि म्हणाला, " शेतकरीदादा, मला थोडेसे तांदुळाचे दाणे देतां कां ? मी ते चिमणीला खायला देईन. मग चिमणी मला कापूस देईल. तो मी आजीला नेऊन देईन. मग ती मला एक फडकं देणार आहे. तें घेऊन मी माझा दुखावलेला पाय बांधीन ! "

शेतकरी म्हणाला, " अरे, मला फार भूक लागली आहे. मला थोडं दूध दे. मग देतों तुला तांदुळाचे दाणे. "

नंतर उंदीर गाईकडे गेला आणि दूध मागूं लागला. तो म्हणाला, " जर तूं मला दूध दिलंस तर तें मी शेतकऱ्याला प्यायला देईन. मग शेतकरी मला तांदुळाचे दाणे देईल. ते मी चिमणीला खायला देईन. मग चिमणी मला कापूस देईल. तो मी म्हाताऱ्या आजीला वाती करायला नेऊन देईन. मग ती मला एक फडकं देईल माझा पाय बांधायला. "

गाय म्हणाली, " अरे, मला फार तहान लागली आहे. मला थोडंसं पाणी आणून दिलंस, तर देईन तुला दूध. "

मग उंदीर गेला नदीकडे, आणि म्हणाला, " नदी, नदी, मला थोडं पाणी देतेस कां ? तें मी गाईला देईन. मग गाय मला दूध देईल. तें मी शेतकऱ्याला देईन. मग तो मला तांदुळाचे दाणे देईल. ते मी चिमणीला देईन. मग ती मला कापूस देईल. तो मी म्हाताऱ्या आजीबाईला देईन आरतीसाठीं वाती करायला. मग ती एक फडकं देईल माझा दुखावलेला पाय बांधायला. "

नदीला उंदराची दया आली. ती म्हणाली, " अरेरे ! काय झालं तुझ्या पायाला ? "

"हा बघ माझ्या पायांत कांटा मोडला आहे, त्यांतून रक्त वाहत आहे."

नदी म्हणाली, "अरेरे, हें फार वाईट झालं बुवा ! तुला हवं असेल तेवढं पाणी खुशाल घेऊन जा."

मग उंदरानें पाणी गाईला नेऊन दिलें.

गाईनें त्याला दूध दिलें. तें घेऊन उंदीर गेला शेतकऱ्याकडे, आणि म्हणाला, "हें घे दूध, आणि मला तांदुळाचे दाणे दे."

शेतकऱ्यानें दूध पिऊन टाकलें आणि त्याला घरांतून तांदुळाचे दाणे आणून दिले.

मग उंदीर गेला चिमणीकडे. तिला तांदुळाचे दाणे देऊन तो म्हणाला, "दे आतां मला कापूस." नंतर चिमणीनें त्याला कापूस दिला. तो घेऊन उंदीर गेला आजीबाईकडे, आणि म्हणाला, "हा घे कापूस."

मग म्हाताऱ्या आजीनें त्याला एक फडकें दिलें त्याचा पाय बांधायला.

फडकें मिळालेलें पहातांच उंदराला फार आनंद झाला.

## ५. सिंह आणि शिकारी

एका मोठ्या रानांत अनेक पशुपक्षी राहात असत. त्या रानांत अगदीं गर्द झाडी होती. त्यांत पुष्कळ हिंस्र पशु दिवसभर लपून राहात आणि रात्र पडतांच इकडे तिकडे भक्ष्य शोधायला हिंडत.

एके दिवशीं एक शिकारी त्या रानांत शिरला. त्यानें बाण लावून आपलें धनुष्य अगदीं सज्ज करून ठेवलें होतें.

शिकाऱ्याची चाहूल लागतांच ते हिंस्र पशु इकडे तिकडे सैरावैरा पळूं लागले. त्यांना त्या शिकाऱ्याची फार भीति वाटत होती. पण त्यांची ही धावपळ पहातांच सिंहाला मोठा राग आला! जंगलाचा राजा तो! त्यांचें रक्षण करायला आपण तेथें तयार असतांना इतर पशूंना भीति काय म्हणून वाटावी? आणि त्यांनीं जीव वांचविण्यासाठीं इकडे तिकडे पळत तरी कां सुटावें? असें त्याला साहजिकच वाटलें.

मग तो रागानें गुरगुरत म्हणाला, "अरे मूर्खांनो, मी इथें हजर असतांना तुम्ही भितां कां? मी आतांच्या आतां तुमच्या शत्रूचा नाश करतों! तुम्ही निर्धास्त राहा."

इतकें बोलून तो सिंह एकदम शिकाऱ्याच्या समोर जाऊन उभा राहिला.

सिंहाला समोर बघतांच शिकारी घाबरून गेला, पण धीर करून म्हणाला, "मी अगोदर माझा दूत तुझ्याकडे धाडतों. तो तुला माझी ताकद दाखवील. मग तूं माझ्याशीं खुशाल लढाई कर."

सिंहानें ही गोष्ट मान्य केली. तो जागच्या जागीं त्या शिकाऱ्याच्या दूताची वाट पहात थांबला.

इकडे त्या शिकाऱ्यानें नेम धरून बाण सोडला. तो बाण नेमका त्या सिंहाच्या मानेंत घुसला!

सिंह त्या बाणाच्या वेदनेनें घायाळ झाला आणि तडफडत तो कसाबसा आपल्या गुहेच्या दिशेनें माघारां फिरला.

तो सिंह उभा होता त्याच ठिकाणीं झाडींत एक कोल्हा लपून राहिलेला होता. तो होता मोठा धूर्त. तो ताबडतोब

झाडींतून बाहेर आला आणि परत गुहेकडे जाणाऱ्या सिंहाला म्हणाला, " काय हो आजोबा, आपण तर ह्या जंगलाचे राजे ! आपल्या शत्रूशीं लढत कां नाहीं तुम्ही ? असे माघारां कां वळलांत ? साऱ्या पशूंचं रक्षण करण्याचं काम सोडून असे भितां कां ? "

मग सिंह त्याला म्हणाला, " नाहीं रे बाबा ! मी त्या शिकाऱ्याशीं मुळींच लढणार नाहीं. त्याच्या दूतानंच मला इतकं घायाळ करून सोडलं आहे. मग त्या शिकाऱ्याची ताकद किती प्रचंड असेल ! "

इतकं बोलून तो सिंह झाडींत कोठच्या कोठें दिसेनासा झाला.

## ६. उंटाची मान

फार वर्षांपूर्वी एका अरण्यांत एक उंट राहात होता. तो दिसण्यांत अगदींच वेडावांकडा आणि बेढब होता, इतकेंच नव्हे तर बुद्धीनेंहि फार मंद होता.

त्या अरण्यांत पुष्कळ ऋषि तपश्चर्या करीत बसत. त्या ऋषींची तपश्चर्या पाहून उंट म्हणाला, " वा ! किती मजा आहे या तपश्चर्येंत ! मी पण आतां तपश्चर्या करतों. "

झालें ! तो उंट तपश्चर्या करूं लागला. ऋषि कठिण व्रतें आचरीत, म्हणून उंट सुद्धां त्यांच्याप्रमाणें तप करूं लागला.

अशीं अनेक वर्षें लोटलीं. उंटाची ती तपश्चर्या पाहून ब्रह्मदेव त्याला म्हणाले, " शाबास, उंटा ! आजपर्यंत तूं फार कठोर तप केलंस ! मी तुला एक वर देतों. तुला

काय हवं असेल तें माग ! मी तुझी एक इच्छा ताबडतोब पूर्ण करीन. ”

ब्रह्मदेवाचें हें भाषण ऐकून उंटाला फार आनंद झाला. त्यानें विचार करण्यांत मुळींच वेळ खर्च केला नाहीं. तो एकदम ब्रह्मदेवाला म्हणाला, “ देवा ! आपण वर देऊं केलात, हें माझं केवढं भाग्य ! माझी मान शंभर हात लांब असती तर किती मजा झाली असती ! हीच माझी इच्छा ! ”

“ तथास्तु ! ” असें म्हणून ब्रह्मदेव तेथून निघून गेले.

इकडे त्या उंटाची मान लांब होऊं लागली. कांहीं वेळानें तर ती शंभर हात लांब झाली. मग त्याच्या आनंदाला काय तोटा ?

आतां भक्ष्य शोधण्याकरितां त्याला त्या अरण्यांत हिंडण्याची मुळींच आवश्यकता राहिली नाहीं. शंभर हातां-वरील सर्व कोवळीं कोवळीं पानें आणि गोड गोड फळें त्याला एका जागीं बसूनच खायला मिळूं लागलीं.

अशा प्रकारें त्या उंटानें सर्व उन्हाळा मोठ्या मजेंत घालविला. त्याची खाण्यापिण्याची अगदीं चैन चाललेली होती.

नंतर पावसाळा आला. आतां त्याला आपल्या शंभर हात लांबीच्या मानेची काळजी पडली. ऐन पावसाचे दिवस ! पाऊस रात्रंदिवस पडूं लागला. सारें अरण्य पावसानें भिजून निघालें. सर्व पशु व पक्षी निवाऱ्याची जागा शोधून आपापलें संरक्षण करूं लागले.

बिचाऱ्या उंटाला मात्र आश्रयाला योग्य जागाच सापडेना ! त्याची मान शंभर हात लांब होती. ती संभाळीत तो कुठें

कोरड्या जागेंत राहणार ! उंट तर पावसानें अगदीं हैराण झाला.

सरतेशेवटीं त्याला एक मोठी गुहा दिसली. त्या गुहेंत आपली मान घालून त्यानें स्वतःचें कांहीं वेळ पावसापासून रक्षण केलें.

यानंतर तर मुसळधार पाऊस पडूं लागला. अरण्यांत जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें ! त्याच वेळीं एक कोल्हा व कोल्ही पावसाच्या माऱ्यानें भिऊन जाऊन निवाऱ्याची जागा शोधीत होतीं. त्यांचें अंग पावसानें ओलेंचिंब झालें होतें. थंडीनें दोघेंहि कुडकुडत होतीं. इतकेंच नव्हे तर पुष्कळ वेळ खावयाला मिळालें नसल्यानें त्यांना सडकून भूक लागलेली होती. ती गुहा दिसतांच दोघेंहि आंत शिरलीं.

कोल्ह्याला त्या उंटाची शंभर हात लांब मान पाहून आनंद झाला. एवढी मोठी मान ! ती उंटाला चटकन् बाहेर कशी काढतां येणार ? त्याला तें शक्यच नव्हतें !

मग काय विचारतां ! कोल्हा आणि कोल्ही यांनीं त्या मानेवर यथेच्छ ताव मारला ! काय त्या बिचाऱ्या उंटाची दुर्दशा !

## ७. नारळाचें नशीब

एकदां बाबांनीं मंडईतून एक नारळ आणला. नारळ दिसतांच गोपू आनंदानें नाचूं लागला. तो म्हणाला, “ आई, आई, फोडूं कां नारळ ? मला खोबरं पाहिजे ! ”

“ आतां फरशीवर आपटून आपणांस फोडणार ! ” असा विचार मनांत येऊन नारळ घाबरला.

गोपूच्या हातांतून नारळ निसटला आणि गडगड धावूं लागला.

गोपू त्याच्यामागें धावूं लागला.

पळत पळत नारळ माजघरांत गेला.

तेथें ताई बसलेली होती. तिला नारळाची चटणी फारच आवडे.

ती म्हणाली, "वा! छान! आज बाबांनीं नारळ आणला वाटतं! आईला विचारून मी चटणी वाटतें आतां!"

नारळ फारच घाबरला.

"आपल्याला फोडणार! खवणीनं खोबरं खोंत्रणार आणि पाट्यावर ठेवून वरवंट्यानं वाटणार! नको रे बुवा! आपले फारच हाल होतील!"

नारळ माजघरांतून निसटला आणि पडवींत गेला.

पडवींत आजी काम करीत होत्या, त्यांनीं तो नारळ पाहिला.

त्यांनीं गोपूला हाक मारली आणि म्हटलें, "बाळ, आईला सांग ह्या नारळाच्या करंज्या करायला!"

हें ऐकतांच नारळ अतिशय घाबरला, "अरे बापरे! आपल्याला उकळत्या तुपांत तळणार!"

करंज्या कर म्हणून गोपू आईला सांगायला गेला. तेवढ्यांत नारळ म्हणाला, "आतां येथून पळच काढला पाहिजे!"

नारळ धावत धावत घराबाहेर पडला. घरासमोरच एक देऊळ होतें. नारळ थेट त्या देवळांत गेला.

पुजारी देवाची पूजा करण्यांत गढून गेला होता. देवळांत खूप मुलें होतीं. तीं पूजा बघत होतीं.

नारळ कोपऱ्यांत जाऊन लपून बसला.

पुजाऱ्यानें गंध, फुलें, अक्षता देवाला वाहिलीं. त्यानें मग आरती म्हटली.

पण नैवेद्य दाखवायला त्याच्याजवळ नारळ नव्हता. त्यानें नैवेद्यासाठीं नुसतें दूधच आणलें होतें.

तोंच कोपऱ्यांतील नारळाकडे त्याचें लक्ष गेलें.

"वा! फारच छान!!" असें म्हणत त्या पुजाऱ्यानें तो नारळ उचलला, आणि जोरानें फरशीवर आपटला!

त्यानें नारळाची एक वाटी स्वतःकरितां ठेवून घेतली.

दुसऱ्या वाटींतील खोबऱ्याचे त्यानें बारीक बारीक तुकडे केले.

पूजा बघण्यासाठीं देवळांत पुष्कळ मुलें जमलेलींच होतीं. त्यांना पुजाऱ्यानें ते खोबऱ्याचे तुकडे देवाचा प्रसाद म्हणून देऊन टाकले.

चटणीसाठीं वरवंट्याकडून चेचून घेण्यापेक्षां, आणि करंज्यांसाठीं उकळत्या तुपांत तळून घेण्यापेक्षां देवाचा प्रसाद म्हणून फुटणें नारळाला आवडलें असेल कां?

---

## ८. चटकदार र्डी

पुंड्या भारी खट्याळ होता. आपल्या वाड्यांतील मुलांच्या कांहींतरी खोड्या काढून तो त्यांना त्रास देई. पुंड्याबद्दल आई-वडिलांकडे तक्रार गेली नाहीं असा एकहि दिवस जात नसे.

कडक रेवडी विकीत एक माणूस पुंड्याच्या दारावरून जात होता. खट्याळ पुंड्याला चणे, फुटाणे, काबली, खारे दाणे आणि रेवडी फार आवडे. पण आईकडून दररोज पैसा कसा मिळणार ह्या वस्तु विकत घ्यायला? मग पुंड्याला एक युक्ति सुचली. पुंड्यानें रेवडीवाल्याला रोजच्याप्रमाणें दारावरून थोडें पुढें जाऊं दिलें. मग तो रेवडीवाल्याच्या मागें गेला आणि त्यानें मागच्यामागें पसाभर रेवडी लांबविली! पुंड्याचा आनंद गगनांत मावेना. रेवडी घेऊन तो पळून गेला आणि लांब एका झाडाच्या सावलींत बसून खाऊं लागला.

दोन चार दिवस निघून गेले. आजहि 'कडक रेवडी' विकीत तो माणूस दारावरून जात होता. पुनः पुंड्यानें दोन्ही हातांनीं पसाभर रेवडी मागच्यामागें लांबविली, आणि तेथून पळ काढला.

आज मात्र रेवडीवाल्यानें पुंड्याला मुकाट्यानें जाऊं दिलें नाहीं. तो पुंड्याला पकडण्याकरतां धावूं लागला. पण पुंड्या कसला वस्ताद! तो दुसऱ्याच एका बोळांत शिरला. या धावपळींत त्याची रेवडी वाटेंत सांडत होतीच!

अगदीं सहज एक अस्वलवाला चौकांतून खेळ दाखवून त्याच बोळांतून बाहेर येत होता. अस्वलाला रेवडी फार आवडते. त्यानें रस्त्यांत सांडलेली रेवडी खाल्ली, इतकेंच नव्हे, तर अधिक रेवडीसाठीं तें पुंड्याच्या दिशेनें धावूं लागलें.

पुंड्याची स्थिति मोठी चमत्कारिक झाली! मागें पळावें तर हा रेवडीवाला पकडणार! बरें, पुढें निसटण्याचा प्रयत्न करावा तर अस्वलाशीं गांठ!!

२

पुंड्या मोठा चतुर ! आयत्या वेळीं त्याला नवीनच युक्ति सुचली. चातुर्यानें तो कुंपणावर चढून पलीकडील वाड्याच्या बागेंत लपून राहिला !

रेवडीवाला आणि अस्वल यांच्या तावडींतून सुटल्याचा त्याला आनंद होतो न होतो, तोंच माळी त्याच्याजवळ आला. माळ्याला वाटलें कीं बागेंतील सिताफळें तोडायलाच हा मुलगा आला असावा !

पुंड्याचा घाबरट चेहरा पाहून माळ्याचा संशय जास्तच वाढला ! पण पुंड्या निष्पाप होता. त्यानें सिताफळें मुळीं चोरलींच नव्हतीं. दोघांची पुष्कळ बोलाचाली झाली. माळ्यानें पुंड्याचे खिसे तपासून पाहिले. त्यांत सिताफळें नव्हतीं म्हणून त्यानें पुंड्याला पुढील दारानें हाकलून दिलें.

फाटकांतून पुंड्या बाहेर पडतो न पडतो, तोंच एक चावरा कुत्रा त्याच्या अंगावर धावून आला. पुंड्यानें स्वतःची कशी-बशी सुटका करून घेतली आणि तो रस्त्यावरून घराकडे परत जाऊं लागला.

तों काय आश्चर्य ! मघाचाच रेवडीवाला समोरून ‘ कडक रेवडी ’ विकीत येत होता ! ! त्यानें पुंड्याला नेमकें पकडलें ! ! !

मग पुंड्याला घेऊन तो रेवडीवाला पुंड्याच्या वडिलांकडे गेला. तों तेथेंहि शिव्यांचा भडिमार !

पुंड्याचा तो दिवस फारच वाईट गेला. अशा तऱ्हेनें तो दिवस गाजला.

यामुळें वाटमारी करून रेवडी खाण्याची त्याची सवय अजिबात मोडली.

# ९. तीन भांडखोर राक्षस

एका जंगलांत तीन राक्षस राहात असत. ते सारे खूप उंच आणि लठ्ठ होते. त्यांना मांस फार आवडे. मासे पकडून खाणें तर त्यांना विशेष प्रिय असे.

एके दिवशीं मासे खाण्याची एका राक्षसाला खूप प्रबळ इच्छा झाली. आपण केव्हां एकदां मासे खातों असें त्याला होऊन गेलें होतें. रोज रोज जंगलांतील जनावरांचें मांस खाऊन त्याला कंटाळा आला होता.

मग तो दुसऱ्या राक्षसाकडे गेला आणि म्हणाला, "दोस्त, आज आपल्याला मासे खायला हवेत बुवा!"

"मग जा कीं नदीवर! तिथें माशांना रे काय तोटा!"

"अरे, पण मासे मला कसे पकडतां येणार! माशांना फसवायला एक सुंदर मुरली दे ना मला! मी मुरली वाजवीन, मग मासे कांठावर येतील. मग मी त्यांना ताबडतोब पकडीन."

यावर दुसरा राक्षस म्हणाला, "माझ्याजवळ नाहीं मुरली! जा, तो बघ एक कोळी नदीकांठीं मासे पकडत आहे. त्याच्याजवळून मुरली मागून घे."

नंतर राक्षसानें त्या माणसाजवळून मुरली मागून घेतली, आणि तो नदीकांठीं बसून तिच्यांतून सूर काढूं लागला.

तोंच दुसरा राक्षस त्याच्याजवळ जाऊन म्हणाला, "काय? मिळाली ना मुरली?"

"हो, मिळाली कीं! ही बघ!"

त्या मुरलीकडे पाहून दुसरा राक्षस म्हणाला, "वा! माझी चेष्टा करतोस होय! हें तर लोखंडी चाकू आहे!"

पहिला राक्षस म्हणाला, " छे ! छे ! मुरलीच आहे."

अशा प्रकारें त्यांनीं खूप वाद घातला. शेवटीं ते आपापसांत मारामारी करूं लागले.

दोघेहि खूप दमले मारामारी करून ! मग त्यांनीं ठरविलें कीं तिसऱ्या राक्षसाचा सल्ला घ्यावा !

दोघे मिळून तिसऱ्या राक्षसाकडे गेले आणि सारी हकीकत त्याला सांगून विचारूं लागले:—

" काय, ही मुरलीच आहे ना ?"

" छे, छे, हें लोखंडी चाक आहे ना ?"

तो वाद ऐकून तिसरा राक्षस म्हणाला, " जा, तुम्ही दोघेहि मूर्ख आहांत ! ही मुरलीहि नाहीं आणि लोखंडी चाक तर नाहींच नाहीं !"

" मग ? " पहिला व दुसरा राक्षस चकित होऊन एकदमच विचारूं लागले.

" हा एक मोडक्या पत्र्याचा लहानसा तुकडा आहे." तिसऱ्या राक्षसानें आपलें मत दिलें.

झालें ! प्रत्येकजण आपलेंच म्हणणें बरोबर आहे, असें म्हणून दुसऱ्याशीं भांडूं लागला.

त्याच वेळीं त्या जंगलांतून एक ब्राह्मण जात होता.

त्याच्याकडे जाऊन आपण न्याय मागावा आणि तो सांगेल तें खरें मानावें असें त्या तिघां राक्षसांनीं ठरविलें.

ब्राह्मणाजवळ जाऊन त्याला हातांतील मुरली दाखवून पहिला राक्षस म्हणाला, " काय रे ब्राह्मणा ! ही मुरलीच आहे ना ? ही मुरली नाहीं असं तूं म्हणालास, तर मात्र मी तुला चांगला चोप देईन."

त्या राक्षसाचें हें भाषण ऐकून ब्राह्मण घाबरून गेला.

तेवढ्यांत दुसरा राक्षस ब्राह्मणाला म्हणाला, " जर हें चाक नाहीं असं तूं मत दिलंस, तर तुला ठार मारून मी खाऊनच टाकीन ! "

तो ब्राह्मण हें ऐकतांच थरथर कांपूं लागला. तोंच तिसरा राक्षस गरजला, " हें बघ, ब्राह्मणा, हा मोडक्या पत्र्याचा तुकडा आहे असंच तूं आपलं मत दिलं पाहिजेस ! नाहीं तर मी तुझं हाड अन् हाड मोडून टाकीन ! "

आतां तर ब्राह्मणाची बोबडी वळली. पण इतक्यांत त्याला एक युक्ति सुचली.

त्या तिन्ही राक्षसांकडे वळून तो म्हणाला, " ठीक आहे. मी योग्य तोच निकाल देतों. तुम्ही तिघेहि त्या नदीच्या पाण्यांत बुडी मारा. जो कोणी सर्वांत शेवटीं पाण्याबाहेर डोकं काढील त्याचं म्हणणं खरं आहे, असं इतरांनीं मानावं."

" कबूल ! कबूल ! ! " असें ओरडत ते तिघेहि राक्षस नदीच्या पाण्यांत बुडी मारून डुंबत राहिले.

इकडे तो ब्राह्मण त्या ठिकाणाहून पळत सुटला, आणि लवकरच दिसेनासा झाला.

संध्याकाळ झाली. जराशानें रात्रहि पडली.

तरी कोणताहि राक्षस पाण्याबाहेर डोकें काढीना !

दुसरा दिवस उजाडला.

तरी सुद्धां कोणताहि राक्षस बाहेर येण्याचें चिह्न दिसेना !

अशा प्रकारें ते तिन्ही राक्षस नदींत बुडून मरण पावले.

हलवायाला अहेर

# १०. हलवायाला अहेर !

एका शहरांत एक हलवाई होता. त्याचें नांव होतें सोमलाल. तो निरनिराळ्या प्रकारची खूप मेवामिठाई तयार करी आणि विकी. त्याच्याइतकी स्वादिष्ट मिठाई तयार करणें फारच थोड्या हलवायांना साधत असेल ! मग गिऱ्हाइकांना काय तोटा ! त्याच्या दुकानीं अनेक लोक मिठाई खरेदी करीत.

एकदां सोमलालच्या दुकानासमोर एक गरीब ब्राह्मण उभा होता. केशवभट हें त्याचें नांव ! पांच मिनिटें झालीं; तरी केशवभट त्या दुकानासमोरच उभा होता.

मेवामिठाईचा सुंदर रंग व गोड वास त्याला मोह पाडीत होता. मिठाईच्या रुचकर वासानें केशवभटाच्या तोंडाला पाणी सुटलें. पण गरीब बिचारा ब्राह्मण ! ती मिठाई विकत घ्यायला त्याच्याजवळ पैसे कुठें होते ?

इकडे सोमलाल हलवाई फार संतापला. त्याला वाटलें, हा ब्राह्मण उगीचच दुकानासमोर उभा राहून आपलें गिऱ्हाईक अडवीत आहे ! शिवाय सोमलाल हा मोठा श्रीमंत हलवाई होता. त्यानें केवळ आपल्या दुकानाच्या नफ्यांतून दोन मोठ्या चाळी विकत घेतल्या होत्या, आणि एक टोलेजंग बंगला स्वतःला राहण्यासाठीं बांधला होता. मग त्याच्या उद्धटपणाला काय सीमा !

तो दुकानाच्या बाहेर येऊन केशवभटाला म्हणाला, “ अरे ए ब्राह्मणा, चल, माझे पैसे देऊन टाक ! ”

बिचारा केशवभट ! तो अगदीं गोंधळून गेला. ब्राह्मण

कांहींच बोलत नाहीं असें पाहून सोमलाल हलवाई आणखी पुढें म्हणाला, " अरे, ऐकूं नाहीं का येत ? "



" मी कुठं मिठाई विकत घेतली आहे ? कसले पैसे देऊं म्हणतां ? "

" अरे वा ! माझ्या मिठाईचा इतका वेळ वास घेतलास ! त्याचे पैसे मुकाट्यानं देऊन टाक ! " हलवाई ओरडला.

" हें काय भलतंच मागणं ? "

पण तो हलवाई जास्तच संतापला. त्याचा चढलेला आवाज ऐकतांच रस्त्यांत पुष्कळ लोक जमा झाले, आणि ही काय भानगड आहे म्हणून चौकशी करूं लागले.

केशवभट पडला गरीब. त्याच्या बाजूनें कोणीच बोलेना ! सर्वांना सोमलाल हलवायाची फार भीति वाटे. कारण तो पडला श्रीमंत आणि अरेराव !

" चल आतां कोर्टांत ! माझे पैसे बुडवतोस काय ! "

केशवभटाजवळ पैसेच नव्हते, तर तो सोमलालला पैसे देणार कुठून ? त्याचा अगदीं नाइलाज झाला.

सोमलालनें केशवभटावर फिर्याद केली. त्या हलवायाला एकसारखें वाटत होतें कीं निकाल आपल्याच बाजूचा होणार ! हो ! तो पडला श्रीमंत, मग साक्षीदारांना काय तोटा !

न्यायाधिशानें सोमलालचें सर्व बोलणें ऐकून घेतलें. मग तो म्हणाला, " मोठा विचित्र प्रकार आहे हा ! बरं, तुझं काय म्हणणं आहे यावर ? " त्या ब्राह्मणाकडे वळून न्यायाधीश म्हणाला.

" महाराज, मी सोमलाल हलवायाच्या दुकानासमोर उभा होतों, ही गोष्ट खरी आहे. मिठाईचा गोड वास मी अनुभवला, हें मी नाकबूल करीत नाहीं. पण त्याबद्दल पैसे पडतील, हें मला स्वप्नांतहि खरं वाटलं नाहीं ! नाहींतर मी तिथें उभा राहिलोंच नसतों ! कारण मी फार गरीब आहें. मी कुठून पैसे देणार, महाराज ? "

यावर न्यायाधीश म्हणाला, " पण कांहींहि करून तूं ह्या सोमलालचे पैसे दिलेच पाहिजेस ! "

" महाराज ! नुसता दुरून वास घेतला याबद्दल पैसे कसे द्यायचे ? "

" थांब, माझं म्हणणं नीट ऐक. दुरून कां होईना, तूं मिठाईचा वास घेतलास, हें तुला कबूल आहे ना ? मग पैसेहि दुरूनच दे म्हणजे झालं ! "

असें म्हणून त्या न्यायाधिशानें केशवभटाजवळ थोडा खुर्दा

एका पिशवींत घालून दिला आणि तो म्हणाला, "हें पहा, ह्या नाण्यांची पिशवी हलवायाच्या कानाजवळ धरून खळखळ वाजव, म्हणजे त्याचे पैसे तूं दिल्यासारखेंच होईल."

न्यायाधिशाचा निवाडा ऐकतांच सर्व लोकांना फार आनंद झाला. केशवभट त्याची स्तुति करीतच आपल्या घरीं गेला. सोमलाल हलवाई मात्र खालीं मान घालून तेथून धुसफुसत निघून गेला. त्याच्या फजीतीला पारावार राहिला नाहीं!

---

## ११. हजार रुपयांची थैली

संध्याकाळचा सुमार होता. या वेळीं एक दहाबारा वर्षांचा मुलगा घराकडे चालला होता. थोड्या वेळापूर्वी त्याच रस्त्यानें कांहीं व्यापारी आपल्या घोड्यांवर बसून गेले होते. घोड्यांचीं पावलें रस्त्यांत स्पष्ट उमटलेलीं दिसत होतीं.

वसंत आपल्या नादांतच चालला होता. तोंच त्याचा पाय कशालासा लागला. त्यानें खालीं वाकून पाहिलें, तों त्याला एक थैली दिसली.

वसंतानें ती थैली उचलली. बरीच जड लागत होती ती! तिच्यांत खूप पैसे असले पाहिजेत खास!

"वा! किती छान! आतां ही थैली माझीच आहे! मला ती रस्त्यांत सापडलेली आहे! तिच्यावर आतां माझाच हक्क!" अशा विचारांत वसंत पुढें चालूं लागला.

आपल्याला एक सुंदर घोडा असावा, त्याच्यावर बसून आपण ऐटीनें फेरफटका करावा, अशी वसंताची फार दिवसांची इच्छा होती!

असा विचार त्याच्या मनांत आला खरा. पण छे !




आपलें हें कृत्य बरोबर नाहीं, असें त्याचें मन त्याला सांगूं लागलें—" आपण कांहीं हें द्रव्य श्रमानं मिळवलं नाहीं. तें आपलं नाहीं. ज्याचं असेल त्याला तें परत देणं आपलं कर्तव्य आहे. " हाच विचार त्याच्या मनांत पुनः घोळूं लागला.

काय करावें ? त्या थैलींतील पैसे आपण स्वतःकरतां घ्यावेत कां ? ते पैसे मालकाला परत दिलेच पाहिजेत, नाहीं कां ?

झालें ! सरतेशेवटीं ते पैसे मालकाला परत नेऊन देणेंच इष्ट, असा त्यानें निश्चय केला.

वसंतानें आपल्या वडिलांच्या मदतीनें थैलीच्या मालकाची चौकशी चालविली. एके दिवशीं वर्तमानपत्रांत एक जाहिरात दिसली—

" हजार रुपये असलेली एक थैली रस्त्यांत
हरवलेली आहे. ती परत आणून देणाऱ्यास
त्यांतील निम्मी रकम बक्षीस देण्यांत येईल. "

जाहिरातीखालीं " रमणलाल शहा, सराफ-कट्टा, भवानीपूर," असा पत्ता होता.

वसंताला ती जाहिरात वाचतांच वाटलें कीं ह्याच रमणलाल शहांची ती थैली असावी. त्याचे वडील विष्णुपंत ह्यांचेंहि तसेंच मत पडलें.

मग ते दोघे पितापुत्र रमणलाल शहा यांजकडे गेले. त्यांनीं ती थैली जशीच्या तशीच त्या व्यापाऱ्याला देऊन टाकली.

पण थैली समोर पहातांच रमणलाल शहाच्या तोंडाला पाणी सुटलें. पैशांचा लोभ त्याला कुठला आवरायला ! पांचशें रुपये वसंताला बक्षीस द्यायला त्याचें मन तयार होईना ! म्हणून त्यानें एक युक्ति केली.

ती थैली व्यापाऱ्यानें त्या दोघांसमोर उघडली आणि म्हटलें, " अरे बापरे ! माझा एक मूल्यवान् हिरा होता या थैलींत ! कुठं दिसत नाहीं तो ! तुम्हीच काढून घेतला असेल ! "

" छे ! छे ! " वसंत एकदम म्हणाला, " ह्या थैलींत फक्त हजार रुपयेच होते. "

" त्याहून जास्त ह्या थैलींत कांहींच नव्हतं ! " विष्णुपंत म्हणाले, " आम्ही तुमचा हिरा मुळीं पाहिलाच नाहीं ! "

" वा ! वा ! म्हणे आम्ही हिरा पाहिलाच नाहीं ! " तो व्यापारी हातवारे करून म्हणाला, " मी माझ्या हातांनीं तो ह्या थैलींत ठेवलेला होता. जा ! तो हिरा आणून द्या मुकाट्यानं ! नाहींतर बक्षीस वगैरे कांहीं मिळणार नाहीं. "

हें भाषण ऐकून विष्णुपंत वसंताला घेऊन तेथून मुकाट्यानें निघून गेले.

मग त्यांनीं त्या व्यापाऱ्यावर फिर्याद दाखल केली.

थोड्याच दिवसांनीं हा खटला सुनावणीस निघाला. रमणलाल शहा यांस न्यायाधीश म्हणाले, " हिऱ्याचा उल्लेख तुम्ही जाहिरातींत कां केला नव्हता ? "

त्या व्यापाऱ्यानें उत्तर दिलें, " असा उल्लेख करणं शहाणपणाचं ठरलं नसतं ! तो हिरा इतका मूल्यवान् होता कीं मग ती थैली कुणीहि परत आणून दिली नसती. "

" अगदीं बरोबर ! " न्यायाधीश म्हणाले, " आणि तरीसुद्धां फिर्यादींनीं ती थैली तुमच्याकडे आणली. म्हणून हें सिद्ध होत आहे कीं ह्या थैलींत हिराच नव्हता ! तुमच्या थैलींत तर हिरा होता, म्हणून ही तुमची खास नव्हे ! वसंताला ही थैली सापडली आणि तिचा मालक सापडला नाहीं, म्हणून ती जशीच्या तशीच मी वसंताच्या हवालीं करतों ! "

न्यायाधिशानें दिलेला हा निकाल ऐकतांच विष्णुपंतांना फार समाधान वाटलें. न्यायालयांत जमलेल्या लोकांनाहि मोठा आनंद झाला.

या पैशांतून वसंताला एक सुंदर घोडा रपेटीसाठीं मिळाला. मग तो रोज घोड्यावर बसून रपेट करूं लागला.

# १२. अंगठीचा लोभ

विजयपूर शहरांत एक ब्राह्मण राहात असे. भिक्षुकी करून त्यानें खूप पैसा मिळविला होता. मग चैनीला काय तोटा! ब्राह्मण असला तरी राजाला साजेल अशा वैभवानें तो राहायचा!

जवळ भरपूर पैसा आणि चैन करण्याची प्रवृत्ति! त्यामुळें मित्रांचा परिवारहि मोठा होता. त्याच्या घरासमोरच एक व्यापारी राहात असे. त्याची आणि ह्या ब्राह्मणाची लवकरच दाट मैत्री जमली. दोघेहि रोज खूप वेळ बातचीत करीत मजेंत राहत असत.

परंतु त्या व्यापाऱ्याला एक फार वाईट खोड होती. कुणाहिजवळ एखादी सुंदर वस्तु दिसली कीं तिचा मोह त्याला आवरत नसे. ती वस्तु तो वाटेल त्या युक्ति-प्रयुक्तीनें चोरून नेई! त्या ब्राह्मणाला व्यापाऱ्याची ही सवय बिलकूल आवडत नसे! ही खोड मोडायला ब्राह्मणानें मग एक युक्ति योजिली. आपल्या मित्राचें वर्तन सुधारावें असें त्याला नेहमीं वाटे. चोराशीं मैत्री जोडायला कुणाला आवडणार!

पुढें एकदां ब्राह्मणानें एक सोन्याची अंगठी तयार करविली. ती सहज त्या व्यापाऱ्याच्या दृष्टीस पडली.

"वा ! किती छान आहे ही !" अंगठी दिसतांच व्यापारी म्हणाला.

"असल्या अंगठीची मला भारी हौस ! म्हणून मुद्दामच मी काल ही तयार करविली." ब्राह्मण म्हणाला.

"फारच मोहक आहे बुवा ही !" असें म्हणून तो लोभानें तिच्याकडे न्याहाळून पाहूं लागला.

ब्राह्मणानें त्याच्या मनांतील मोह ताबडतोब ओळखला. मग त्या ब्राह्मणानें ती अंगठी उचलून काळजीपूर्वक डबींत ठेवली आणि एका कोनाड्यांत ती डबी ठेवून दिली.

इतर कांहीं गप्पा झाल्यावर तो व्यापारी स्वतःच्या घरीं परत गेला. पण ती अंगठी चोरण्याचा निश्चय करूनच तो घरीं पोंचला.

इकडे रात्र पडल्यावर ब्राह्मणानें ती डबी उघडली आणि अंगठी बोटांत घातली.

मुलांनीं एक विंचू पकडून ठेविलेला होता, तो ब्राह्मणानें त्या डबींत घालून ठेवला, आणि पूर्वींप्रमाणेंच डबी बंद करून कोनाड्यांत ठेवून दिली. मग जवळच्या पलंगावर तो आडवा झाला.

मध्यरात्र झाली. ब्राह्मण झोपीं गेला नव्हता, तर केवळ झोपेचें सोंग घेऊन तो अंगावर पांघरूण ओढून पडला होता.

तोंच खिडकीशीं कसलासा आवाज झाला. तों त्याला तो व्यापारी खिडकीजवळ दिसला. ब्राह्मणानें ती पूर्वेकडची बिन गजांची खिडकी मुद्दामच उघडी ठेविली होती.

मग काय ? व्यापारी दिसतांच ब्राह्मण लागला घोरायला !

व्यापाऱ्यानें खिडकींतून आंत अलगद उडी टाकली आणि कानोसा घेतला.

व्यापाऱ्याला वाटलें कीं ब्राह्मणाला गाढ झोप लागलेली आहे. तो हळूच कोनाड्याकडे गेला आणि त्यानें ती डबी उचलली. इकडे तिकडे पाहून तो परत खिडकीकडे वळला. इतक्यांत त्याला वाटलें कीं ब्राह्मणाला तर छान झोप



लागलेली दिसते. तेथेंच उभें राहून त्यानें ती डबी उघडली आणि अंगठी घेण्यासाठीं आंत हात घातला.

तों काय ! त्यांतल्या विंचवानें त्याच्या हाताला एकदम नांगी मारली ! !

भान न राहून व्यापारी त्या वेदनेनें मोठ्यानें ओरडला.

इकडे तो ब्राह्मण ही सारी गंमत पहातच होता.

पडल्या पडल्या हसून तो म्हणाला, " कां शेटजी ? अंगठी कशी काय आहे ? छान आहे, नाहीं ! "

हें बोलणें ऐकून व्यापारी खजील झाला. त्यानें मुकाट्यानें ब्राह्मणाची क्षमा मागितली आणि चोरी करण्याची सवय सोडण्याची शपथ घेतली.

---

## १३. एक घाव, दहा तुकडे !

प्रताप खिडकींत उभा राहून रस्त्याकडे पहात होता. मोठा आळशी होता तो ! त्याला कामधंदा कांहीं सुचतच नसे ! खावें-प्यावें आणि गांवभर भटकावें हाच त्याचा दिनक्रम ! !

प्रतापला एकदां रस्त्यावर एक ढकलगाडी दिसली. तिच्यावर गुडदाणी आणि राजगिऱ्याच्या वड्यांचे ढीगच्या ढीग रचलेले होते ! प्रतापच्या तोंडाला पाणी सुटलें ! त्यानें तावडतोब पुष्कळशी गुडदाणी विकत घेतली.

गुडदाणीचा पुडा प्रतापनें खिडकींत उघडून ठेवला. इतकी गुडदाणी एकदम कुठली संपवतां येणार ? एकेक तुकडा तो तोंडांत टाकीत होता. पण गोड पदार्थाभोंवतीं माशा जमायला कितीसा उशीर ! गुडदाणीवर माशा बसूं लागल्या.

पण आळशी प्रताप त्या माशांना हाकलण्याऐवजीं म्हणाला, " जा, पळा, नाहींतर फुकट मराल ! "

माशा कां त्याच्या बोलण्याकडे लक्ष देणार! त्या तशाच गुडदाणीवर बसून राहिल्या. इतकेंच नव्हे, तर आणखी इतर माशाहि तेथें जमा झाल्या. गोड पदार्थांचा लोभ त्या कशा सोडतील ?

प्रतापला माशांनीं केलेला अपमान सहन झाला नाहीं. त्यानें जवळच पडलेलें एक वर्तमानपत्र उचललें आणि त्या माशांवर जोरानें घाव घातला. त्याबरोबर दहा माशा मेल्या. गुडदाणीवर त्या दहा माशा एकदम मरून पडल्या !

" वा ! छान ! " प्रताप ऐटीनें म्हणाला, " काय छान घाव घातला मी ! एका फटकाऱ्यांत दहा ! आतां साऱ्या जगाला आपला हा प्रताप सांगितला पाहिजे. " मग प्रतापनें एक मोठा कागद घेतला. त्या कागदावर मोठ्या अक्षरांत त्यानें लिहिलें, " ए का घा वां त द हा ! " तो कागद त्यानें आपल्या कोटावर चिकटविला. त्यानें लिहिलेलीं अक्षरें इतकीं मोठीं आणि स्पष्ट होतीं कीं दूर अंतरावरूनहि तीं सहज वाचतां येत.

मग तो कोट घालून प्रताप प्रवासाला निघाला. प्रवासांत खाण्याकरितां म्हणून त्यानें थोडी गुडदाणी खिशांत कोंबली. प्रवास करतां करतां प्रताप राजधानीला पोंहोंचला. तेथें एका रस्त्यानें जात असतांना त्यानें एक दवंडी ऐकली.

" या राजधानीच्या जवळच अरण्यांत दोन वाघ आहेत. ते लोकांना फार त्रास देतात आणि ठार मारतात. जो

इकडे प्रतापनें एक तीक्ष्ण टोकाचा दगड घेतला आणि पहिल्या वाघावर जोरानें फेकला. त्यामुळें वाघाचा डोळाच फुटला. तेव्हां रागारागानें उठत तो दुसऱ्या वाघाला जागें करून म्हणाला, "कां? फार मस्ती आली आहे तुला? माझी चेष्टा करतोस होय तूं! थांब, आतां तुझा चांगला समाचार घेतों!"

दुसरा वाघहि आतां संतापला; तो म्हणाला, "वा! वा! माझ्यावर खोटा आळ काय म्हणून?"

झालें! दोन्ही वाघ आपापसांत लढूं लागले!!

थोड्याच अवधींत ते दोन्ही वाघ एकमेकांजवळ मरून खालीं पडले.

दोन्ही वाघ मेले अशी खात्री होतांच प्रताप झाडावरून खालीं उतरला. त्यानें आतां आपली तलवार म्यानांतून बाहेर काढली आणि प्रत्येक वाघावर एकेक वार केला.

मग तो जंगलाबाहेर त्याचे शंभर घोडेस्वार होते त्यांच्या-जवळ गेला आणि म्हणाला, "लोक हो! मी दोन्ही वाघ ठार मारले आहेत! चला, त्यांना राजधानीकडे घेऊन जाऊं या!"

सारे घोडेस्वार आश्चर्य करीतच वाघांना घेऊन राजधानीला पोंहोंचले.

दोन्हीहि वाघ मेलेले दिसतांच राजा प्रतापला म्हणाला, "तूं फार प्रतापी दिसतोस. माझ्या राज्यावर तुझे मोठे उपकार झालेले आहेत. मी तुला माझा सेनापति नेमतों!"

दहा हजार रुपये मिळतांच प्रतापचा आनंद गगनांत मावेना. तो मनांत म्हणाला, “ काय मजा आहे ! एका घावांत दहा ! मी आतां सेनापति होणार ! ”

---

## १४. गुराख्याची शिळा

फार पुरातन काळची गोष्ट आहे ही ! विक्रमादित्य राजा राज्य करीत होता ना, त्या वेळची ! ! त्यावेळीं माळव्यामध्यें एक गुराखी राहात असे. दूध विकूनच तो आपला चरितार्थ चालवी.

दररोज सकाळीं तो धार काढी व मग आपलीं गुरें घेऊन रानांत जाई, व काळोख पडला कीं गुरें वळवीत गाणीं गात घरीं परत येई. मग दूध काढून तें मोजून मुलांजवळ देई, आणि त्यांना संध्याकाळचा रतीब घालायला धाडी.

एके दिवशीं त्या गुराख्याचा एक बैल आपला कळप सोडून रानांत निसटून गेला. सकाळपासून गुराख्यानें खूप शोध केला, पण व्यर्थ !

दुपार झाली, तरी बैल सांपडण्याचें चिह्न दिसेना ! गुराख्याला मोठी काळजी वाटूं लागली.

कांहीं वेळानें संध्याकाळ झाली. गुराखी गुरें घेऊन खिन्न मनानें घराची वाट चालूं लागला.

तोंच त्याला आपल्या हरवलेल्या बैलाचा आवाज ऐकूं आला. गुराख्यानें आवाजाच्या दिशेनें वळून पाहिलें, तों खरेंच ! चुकलेला बैल धावत धावत कळपाकडेच येत होता.

मग तो प्रसन्न मनानें बागेंतून बाहेर पडला आणि घराच्या दिशेनें चालूं लागला.

तोंच एक मोठा राक्षस त्याच्यासमोर उभा राहिला, आणि म्हणाला, " माझ्या परवानगीशिवाय हीं फळें घेणारा तूं रे कोण ? टाक तीं फळें खालीं, नाहींतर..........."

राक्षसाचें उग्र रूप पाहूनच तो गुराखी घाबरून गेला होता. ती धमकी ऐकतांच त्याची बोबडी वळली.

त्यानें मुकाट्यानें सारीं मुसुंबीं त्या राक्षसाच्या हवालीं केलीं. मग राक्षसानें त्याला सोडून दिलें.

तोंच हिरवें गवत खात खात त्याचा बैलहि तेथें आला. त्याला घेऊन निराश मनानें तो गुराखी घरीं गेला. पण ही गुप्त गोष्ट त्याच्यानें आपल्या बायकोला सांगवेना ! स्वतःचा मूर्खपणा तो तिला कसा सांगणार ?

पण ती हकीकत त्याला फार वेळ मनांतहि गुप्तपणें ठेववेना ! वरें, ती त्याला विसरूनहि जातां येईना ! !

शेवटीं तो गेला न्हाव्याकडे. त्याला विश्वासांत घेऊन त्या गुराख्यानें सारी हकीकत त्याला सांगितली.

न्हावी म्हणाला, " मित्रा, मी जर तुझ्या जागीं असतों तर पुनः त्या बागेंत गेलों असतों."

" कशाला ? " गुराख्यानें अधीरतेनें विचारलें.

" म्हणजे ? तो राक्षस समोर येण्याच्या आंत मी सारीं फळं भराभर खाऊन टाकलीं असतीं ! "

" वा ! मग तो राक्षस ठार नाहीं का मारणार ? "

"छे ! छे ! ! तूं मूर्ख तर नाहींस ? तीं फळं खाल्ल्यावर तुझ्या त्या बैलाला ठार मारलं कां राक्षसानं ? अरे बाबा, तीं नुसतीं तोडून उपयोगी नाहीं."

"मग ?"

"मग काय ? तीं चटकन् खाऊन टाकलीं, तरच फायदा आहे, हें कसं नाहीं तुला समजत ?"

गुराख्याला वाटलें कीं खरेंच ! मुसुंबीं घेऊन पळण्याऐवजीं तीं भराभर खाल्लीं कीं झालें काम ! आपण खूप सुंदर दिसूं ! मग तो राक्षस काय करणार ?

दुसऱ्याच दिवशीं रोजच्याप्रमाणें गुरांना चरायला सोडून तो गुराखी एकटाच बागेकडे निघाला.

मुसुंब्यांचा सुवास सर्वत्र दरवळलेला होता. तो गोड गोड वास हुंगतांच त्याला जास्तच मोह उत्पन्न झाला, आणि तो भराभर वाट चालूं लागला.

लवकरच तो बागेंत शिरला. मग त्यानें हाताला येतील तीं मुसुंबीं भराभर तोडलीं आणि तोंडांत कोंबलीं ! सालें आणि बिया यांच्यासकटच त्यानें तीं पटापट गिळून टाकलीं !

तोंच तो राक्षस त्याच्यासमोर दत्त म्हणून उभा राहिला ! पण आतां त्याचा इलाज चालेना ! गुराख्यानें तीं मुसुंबीं खाल्लीं होतीं !

त्या गुराख्याला मात्र खूप आनंद झाला. आपला विजय झाला असेंच त्याला वाटलें.

मग तो राक्षस मुकाट्यानें परत वळला आणि बागेंत दिसेनासा झाला. पण तो निराश होऊन मात्र नव्हे ! त्याला

तर फारच मौज वाटली ! त्या गुराख्याची फजीति होणार हें मनांत येऊन त्याला कां नाहीं आनंद वाटणार ?

तीं मुसुंबीं खाल्ल्यावर जवळचें हिरवेंगार गवत खावें लागत असे. त्या गवताच्या रसामुळें त्या जादूच्या मुसुंब्यांची शक्ति आंवाक्याबाहेर जात नसे ! हें गुपित फक्त त्या राक्षसालाच माहीत होतें. त्या गुराख्याच्या बैलानें सहज गवत खाल्लें होतें. म्हणून तो सुंदर दिसत होता.

पण गुराख्याला ह्या गोष्टीची काय कल्पना असणार ? आणि तो राक्षस तर त्याला कांहींच न सांगतां मुकाट्यानें निघून गेला होता !

इकडे तीं मुसुंबीं त्या गुराख्याच्या पोटांत मोठमोठीं व्हायला लागलीं ! त्या बरोबर तो गुराखीहि उंच होऊं लागला ! त्याचें पोटहि जास्त जास्त फुगायला लागलें ! !

शेवटीं तो गुराखी इतका उंच झाला कीं त्या खडकाला त्याचें डोकें लागूं लागलें !

त्याचें पोटहि मोठें होतच होतें. तें हळूं हळूं त्या भगदाडांतहि मावेना !

तरी तो गुराखी उंच होतच होता आणि त्याचें पोट वाढतच होतें !

मग तो दुःखानें ओरडूं लागला, पण व्यर्थ ! त्या रानांत त्याच्या मदतीला कोण धावणार ?

गुराखी जास्तच मोठ्यानें ओरडूं लागला ! पण त्याला तेथून हलतां येईना ! आणि तो जास्तच मोठा होत होता !

त्याची उंची एकसारखी वाढतच होती! बिचारा गुराखी ओरडून ओरडून दमला.

कांहीं वेळानें त्या गुराख्याचें एका मोठ्या शिलेंत रूपांतर झालें!

त्या ठिकाणीं माळवा प्रांतांत ती शिला अद्यापिहि दिसते असें म्हणतात.

---

## १५. चन्द्र–दूत

एक मोठें अरण्य होतें. तिथें खूप मोठमोठे वृक्ष होते, नद्या होत्या आणि अनेक लहान मोठे ओढे होते. कांहीं ठिकाणीं सरोवरेंहि होतीं.

त्या अरण्यांत गेल्या दोन वर्षांत पावसाचा एक थेंबहि पडला नव्हता. झाडें आणि वेली सुकून चाललीं होतीं. ओढे तर कोरडे ठणठणीत पडले होते. नद्यांचेंहि पाणी आटत चाललें होतें. साऱ्या जनावरांना मोठी काळजी पडली होती. त्यांना प्यायला पुरेसें पाणीच नव्हतें!

त्या अरण्यांत हत्तींचा एक मोठा कळप राहात असे. त्या हत्तींची दुर्दशा तर विचारूंच नका! लहान जनावरें थोडें पाणी पीत, पण हत्तींची तहान मोठी आणि त्यांना आंघोळीला सुद्धां भरपूर पाणी लागे.

आतां त्यांना आंघोळ करतां येईना; पाण्यांत डुंबतां येईना! त्यांची कातडी कोरडी आणि जाड दिसूं लागली. तिचें पूर्वींचें तेज कुठच्या कुठें नाहींसें झालें. कांहीं हत्ती तर बिचारे तडफडत प्राण सोडूं लागले.

मग हत्तींचा राजा पाणी शोधायला निघाला. त्याल
हत्तींची दुर्दशा कशी पाहवणार, नाहीं का ? हत्तींच्य
राजानें इकडे तिकडे खूप शोध केला. सरतेशवटीं त्याला एक
सुंदर सरोवर सांपडलें. जंगलाच्या मध्यभागीं तें इतके दिवस
दडलेलें होतें !

आनंदानें चीत्कार करीत त्यानें सर्व हत्तींना ही वातम
सांगितली. झालें, सारे हत्ती त्या सरोवराकडे निघाले. धाव
सुटले सगळे !

तेथें जाऊन हत्ती प्रथम पोटभर पाणी प्याले. मग त्यांन
जलक्रीडा सुरू केली.

हें सरोवर कधींच आटत नसे. जमिनीच्या खालून अनेक
झरे त्या सरोवराला मिळालेले होते, म्हणून त्यांत विपुल
पाणी असे.

दररोज रात्रीं सारे हत्ती त्या सरोवरावर जाऊं लागले
तेथें पोटभर पाणी पिऊं लागले आणि जलक्रीडा करूं लागले
साऱ्या हत्तींना आतां आनंद झाला होता.

हत्ती सुखी झाले खरे, पण त्या सरोवराजवळ राहाणा
ससे दुःखीच होते ! अनेक सशांचीं घरें हत्तींच्या पायां
चुरडलीं जात आणि पुष्कळसे ससे त्यांच्या पायांखाल
सांपडून ठार होत !

मग एके दिवशीं सशांची सभा भरली. " आपलं संरक्ष
कसं करावं ? " हाच त्यांच्या चर्चेचा विषय होता. त्यां
खूप खूप वादविवाद केला, ना.

सरतेशवटीं एक म्हातारा म्हणाल

IRBK-0102006